**<u>ठळक बातम्या</u>**

- धर्मस्वातंत्र्य विधेयक कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही तर बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना, पाइप गॅसचा वापर वाढवण्यासाठी विविध सवलती

- पश्चिम बंगाल आणि केरळम विधानसभेसाठी भाजपाकडून उमेदवार यादी जाहीर, निवडणूक आयोगाकडून पश्चिमबंगालमध्ये मुख्य सचिव, पोलीस महासंचालकांची बदली

- ओदिशात कटक इथं रुग्णालयाला आग लागून १० जणांचा मृत्यू

**आणि**

- नवतेज सरना, ममता कालिया, राजू बाविस्कर यांच्यासह विविध भाषांमधील लेखकांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

<><><><><>

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक हे कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज विधानसभेत धर्मस्वातंत्र्य विधेयकावर चर्चेला सुरुवात करताना बोलत होते. या विधेयकानुसार बेकायदेशीर धर्मांतरासाठी केलेला विवाह रद्द केला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड - मुख्यमंत्री - - -**

कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेला धर्मांतर करण्यासाठी योग्य त्या प्राधिकरणाकडे आगाऊ नोटीस द्यावी लागेल. त्यानंतर संबंधित प्राधिकरण हे अशा पद्धतीचं धर्मांतर योग्य आणि स्वेच्छेनं आहे की नाही याची चौकशी करेल. अशी नोटीस दिली नसेल तर सदर धर्मांतर रद्द केले जाईल. अशा धर्मांतरातून लग्न होऊन नंतर लग्नविच्छेद झाल्यावर तो विवाहदेखील रद्द ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना असणार आहे. अशा पद्धतीच्या धर्मांतराबद्दल असलेल्या तक्रारी केवळ रक्ताच्या नात्याकडून असलेल्या नातेवाईकांना अथवा पोलिसांना

करता येतील. यासाठी विविध पातळ्यांवर दंडाची आणि कारावासाची तरतूद केली आहे, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

अनेक वेळा धर्मांतराच्या मुद्द्यावर कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते. प्रचलित कायद्यात याबाबत सुस्पष्ट तरतुदी नाहीत, त्यामुळे नव्या कायद्याची गरज आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. संविधानाच्या कलम २५ नुसार धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आहे, पण सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं आहे की प्रत्येकाला आपल्या धर्माचा अवलंब करायचा अधिकार असला तरी काही मर्यादा आहेत, असं त्यांनी नमूद केलं.

धर्मस्वातंत्र्य विधेयकानुसार ज्याच्यावर धर्मांतर घडवून आणल्याचा आरोप आहे त्यालाच निर्दोषत्व सिद्ध करावं लागणार आहे, ही अन्याय्य बाब असून यामुळे गैरवापर होईल, अशी भीती भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. याचा सरकारनं फेरविचार करावा अशी सूचना त्यांनी केली.

धर्मस्वातंत्र्य विधेयक हे संविधानाच्या विरोधात आहे अशी टीका अस्लम शेख यांनी केली. यामुळे दोन सज्ञान व्यक्तींना एकमेकांशी विवाह करायचा असेल आणि त्यांच्या कुटुंबियांनी तक्रार केली तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल अशी भीती शेख यांनी व्यक्त केली.

हे विधेयक एकतर्फी असून केवळ एका धर्माला लक्ष्य करण्यासाठी आहे असा आरोप समाजवादी पक्षाचे सदस्य रईस शेख यांनी यावेळी केला. ज्या अहवालाच्या आधारे हे विधेयक सादर केलं आहे तो अहवाल कुठं आहे, असा सवाल करत त्यांनी विधेयकाला विरोध केला.

**<><><><><>**

गॅस सिलिंडरचा काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी तपासणी मोहीम राबवली जात आहे. तसंच, पीएनजी वापरण्याचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांसाठी काही कंपन्या विशेष सवलती देत आहेत, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी दिली. देशभरात ओटीपी आधारित सिलिंडर वितरणाचं प्रमाण ७२ टक्के इतकं झालं आहे, असंही त्या यावेळी म्हणाल्या.

**- - - होल्ड... बाईट- सुजाता शर्मा - - -**

देशातले सर्व तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने आणि सुरळीतपणे कार्यरत आहेत. देशात कुठेही इंधनसाठा संपल्याची तक्रार दाखल झालेली नाही, अशी माहिती त्यांनी दिली.

एलपीजी घेऊन आलेलं शिवालिक जहाज आज मुंद्रा बंदरात पोहोचलं असून उद्या आणखी एक जहाज पोहोचणार आहे. याशिवाय आणखी एक जहाज भारताच्या मार्गावर असल्याची माहिती बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी आज दिली. या जहाजावर सुमारे ८१ हजार टन कच्चं तेल असल्याचं सिन्हा म्हणाले.

इराणमध्ये असलेले सुमारे साडे पाचशे भारतीय नागरिक आर्मेनियात दाखल झाले आहेत. ९० नागरिक अझरबैजानमध्ये दाखल झाले असून या सर्वांच्या स्थलांतरासाठी तेहरानमधल्या भारतीय दूतावासानं आवश्यक ती मदत केल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.

<><><><><>

एलपीजीच्या काळाबाजार प्रकरणी विविध जिल्ह्यात नेमलेल्या समित्यांनी आत्तापर्यंत १ हजार २०८ सिलेंडर जप्त केले असून, २३ गुन्हे दाखल करून १८ जणांना अटक केल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी आज विधानपरिषदेत दिली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३३ लाख ६६ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज सभागृहातल्या सर्व पक्षांच्या गट नेत्यांची बैठक घेतली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात बेशिस्त वर्तनाबद्दल निलंबित केलेल्या आठ विरोधी खासदारांचं निलंबन रद्द करण्याकरता एकमत निर्माण करण्यासाठी ही बैठक बोलावली होती, असं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. कामकाजादरम्यान सभागृहाचा कोणताही सदस्य हौद्यात उतरणार नाही यावरही या बैठकीत एकमत झालं.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज केरळम आणि पश्चिम बंगालसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

भाजपानं पश्चिम बंगालसाठी १४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी निवडून आलेल्या कोलकात्यातल्या भबानीपुर विधानसभा मतदार संघातून सुवेंदू अधिकारी यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

भाजपानं केरळमधल्या ४७ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. या यादीनुसार केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन यांना कांजीरापल्ली इथून तर प्रदेशाध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांना नेमोम इथून उमेदवारी देण्यात आली आहे. केरळमध्ये विधानसभेच्या १२६ जागांसाठी ९ एप्रिलला मतदान होणार आहे.

<><><><>

पश्चिम बंगालमधे निवडणूक आयोगाने मुख्य सचिव, गृह सचिव, पोलिस महासंचालक आणि कोलकाताच्या पोलिस आयुक्तांची बदली केली आहे.

याप्रकरणी नाराजी व्यक्त करत तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी राज्यसभेतून सभात्याग केला. हा निर्णय निवडणूक आयोगाचा असून सरकार किंवा संसदेची त्यात काहीही भूमिका नाही, असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले.

<><><><>

ओदिशामधे कटक इथल्या एस.सी.बी रुग्णालयाच्या ट्रॉमा केअर सेंटरला आज पहाटे लागलेल्या आगीत १० जणांचा मृत्यू झाला. मृतांमधले बरेच जण रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल रुग्ण होते. या घटनेत रुग्णांना वाचवताना रुग्णालयातले ११ कर्मचारी होरपळून जखमी झाले आहेत. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. केंद्र सरकार मृतांच्या कुटुंबांना २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये मदत देणार आहे.

<><><><>

परराष्ट्र सेवेतले निवृत्त अधिकारी नवतेज सरना यांच्या Crimson Spring या पुस्तकाला इंग्रजी भाषेसाठीचा तर ममता कालिया यांच्या जीते जीते अलाहाबाद या पुस्तकाला हिंदीभाषेसाठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. हेन्री मेन्डोन्सा यांच्या कोकणी काव्यम - रुपानी आणि रुपकम या पुस्तकाला कोकणी भाषेसाठी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे.

ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मचरित्राला यंदाचा मराठी भाषेसाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. बाविस्कर हे सेवानिवृत्त

कलाशिक्षक असून जळगाव जिल्ह्यात ते कार्यरत होते. १ लाख रुपये, मानचिन्ह आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरुप असून ३१ मार्च रोजी नवी दिल्लीत त्याचं वितरण होणार आहे.

**<><><><><>**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या घसरणीला शेअर बाजारांनी आज विराम दिला. सकाळच्या सत्रात घसरलेले शेअर बाजार दुपारनंतर मोठ्या प्रमाणात वधारले. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ९३९ अंकांची वाढ झाली आणि तो ७५ हजार ५०३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २५८ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ४०९ अंकांवर बंद झाला.

**//<><><><><>//**